Pune Police

# पी. एम. टी. बस प्रवासा मध्ये पाकीटचोरी करणाऱ्या इसमास अटक किं.रू १,१८,३००/- चा माल जप्त..

पुणे शहरा मध्ये पी.एमटी बसमध्ये प्रवास करणा-या प्रवासी इसमांचे पाकीट, महिलांच्या हातातील सोन्याच्या बांगडया तसेच गळयातील सोन्याची चैन चोरीच्या गुन्हयामध्ये वाढ झालेने मा.पोलीस आयुक्त,पुणे, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे व मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे यांनी उपरोक्त गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सुचना दिल्या होत्या.

सुचनाप्रमाणे पोलीस हवालदार अनिल घाडगे, यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे स्वारगेट परिसरात सापळा लावून आरोपीत नामे राजु नारायण जाधव वय २४ वर्ष रा. राजीवगांधीनगर, बिबवेवाडी पुणे मुळगाव फुलाम्बरी जिल्हा औरंगाबाद यास दिनांक ११/०८/२०१७ सी.आर.पी.सी ४१(१)(ड) अन्वये अटक केली. त्याचेकडे तपास करता त्याने स्वारगेट, शिवाजीनगर, पुणे स्टेशन या प्रवासा दरम्यान पाकीटचोरीचे गुन्हे केले असल्याचे सांगून स्वारगेट, बंडगार्डन, शिवाजीनगर, चतु:श्रृंगी या पोलीस ठाणेकडील ८ गुन्ह्यातील एकूण १,१८,३००/- मुद्येमाल त्याचेकडून हस्तगत करण्यात आलेला आहे.

आरोपीताकडुन पुणे शहरातील खालील पोलीस ठाण्याचे एकुण ०८ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

१. स्वारगेट पोलीस ठाणे गु.र.नं ४४८/२०१६ भादंविक.३७९

२. स्वारगेट पोलीस ठाणे गु.र.नं ०१/२०१७ भादंविक.३७९

३. स्वारगेट पोलीस ठाणे गु.र.नं १९/२०१७ भादंविक.३७९

४. स्वारगेट पोलीस ठाणे गु.र.नं ६३/२०१७ भादंविक.३७९

५. स्वारगेट पोलीस ठाणे गु.र.नं १२३/२०१७ भादंविक.३७९

६. बंडगार्डन पोलीस ठाणे गु.र.नं २८०/२०१७ भादंविक.३७९

७. शिवाजीनगर पोलीस ठाणे गु.र.नं १७४/२०१७ भादंविक. ३७९

८. चतु:श्रृंगी पोलीस ठाणे गु.र.नं ३२५/२०१७ भादंविक.३७९

उपरोक्त आरोपीताविरूध्द स्वारगेट पोलीस ठाणे गु.र.नं ४८/२०१४ भादंविक ३९९,४०२ आर्म ॲक्ट ४,२५ अन्वये यापुर्वीचा गुन्हा दाखल आहे.

वरील कामगिरी गुन्हे शाखचे श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, श्री. पंकज डहाणे, पोलीस उप-आयुक्त, श्री. सुरेश भोसले, सहाय्यक पोलीस आयुक्त-१. यांचे मार्गदर्शनाखाली युनिट ३ गुन्हे शाखा चे सिताराम मोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, रविंद्र बाबर, सपोनि, अनिल घाडगे, गुणशिलन रंगम, गजानन गाणबोटे, महेंद्र पवार, शिवानंद स्वामी, सुधीर सोनवणे, यांनी केली आहे.


गुन्हे शाखा, युनिट ३ पुणे